FORM-1 A

N.C.R.B.
I.I.F.-1

# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य State: महाराष्ट्र, जिल्हा District: मुंबई, पोलीस ठाणे Police Station: ला.प्र.वि, पहिली खबर क्र. FIR No.: २८, वर्ष Year: २०२४ दिनांक Date: १३/०९/२०२४

2. (i) अधिनियम Act: ७, कलमे Sections: भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम
   (ii) अधिनियम Act ........, कलमे Sections: १९८८
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day: गुरुवार, तारीख पासून Date from: १२/०९/२४ वेळ Time: ०३:१५, तारीख पर्यंत Date to: १२/०९/२४ वेळ Time: २२:१२

   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)

   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00

   (b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा Information received at P.S. तारीख Date: १२/०९/२०२४, वेळ Time: १४:०० वा

   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No.: ११/२४, तारीख Date: १३/०९/२०२४, वेळ Time: १०:०४

4. माहितीचा प्रकार Type of Information: लेखी, लेखी / तोंडी Written / Oral: लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण Place of Occurrence : (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Direction and distance from P.S. ........, चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. Chouki/Beat/O.P. Name and No. ........

   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name, ठिकाणाचे नंबर No. if any, गल्ली Ward, रस्त्याचे नाव Name of road: अंधेरी मेट्रो स्टेशनच्या खाली, अंधेरी पोलीस ठाणे जवळील फुटपाथवर, अंधेरी सहार रोड, अंधेरी पूर्व, मुंबई

   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable Place ........, गाव Village ........, पोस्ट Post ........, तालुका Taluka ........, जिल्हा Distt. ........, राज्य State ........

   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ........, तालुका Taluka ........, जिल्हा Distt. ........, राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

   (a) नाव Name: दिनेश जोगापुरा (b) वडीलाचे / पतीचे नाव Father's /Husband's Name: छोटेलाल जोगापुरा

   (c) जन्म तारीख व वय Date of Birth & Age: ४४ (d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय फोन नं. Phone No.: ९५१९२००८४२

   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ........ दिल्याचा दिनांक Date of Issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation ........

   (g) धर्म Religion: हिंदू, जात Caste ........, जनजात Sub-Caste ........

   (h) पत्ता : Address: बी/२, डी.जी नगर, वडू आर्च बिल्डिंग समोर, न्यू लिंक रोड, महावीर नगर, कांदिवली (प), मुंबई-६७
   गल्ली / सर्वे नं. Ward, घर / नाव नंबर House/Name No., फोन / मो. नंबर Phone/M. No., पॅन नं. Pan No., वोटर्स नं. Card No.
   रस्त्याचे नाव Road ........ जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ........ गाव Village ........ पोस्ट Post ........ पो. स्टे. P. Stn. ........
   तालुका Taluka ........ जिल्हा Distt. ........ राज्य State ........ सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

   Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

   मनोहर नामदेव रहाणे वय ४२ वर्षे, पो.शि.क्र. ०९२९८, काशीगाव पोलीस ठाणे, मिरा-भाईंदर, वसई-विरार, ठाणे, राहणार पंतनगर रेल्वे पोलीस वसाहत, बि.क्र.१०, खो.क्र.१८, बी विंग, घाटकोपर (पूर्व), मुंबई-७५

फिर्यादि

श्री. जीग्नेश छोटेलाल जोलापरा वय ४४ वर्ष, धंदा: नोकरी, राही ५ बी/२, श्रीजी नगर, चर्च आर्च बिल्डिंग समोर, न्यू लिंक रोड, महावीर नगर, कांदिवली पूर्व, मुंबई - ६७ यांचा सविस्तर जबाब स्वतंत्र कागदावर घेण्यात आला असून, त्यास गुन्ह्याची प्रथम खबरी अहवाल संबोधण्यात येत आहे.

समक्ष,

Gaikwad

(अविनाश गायकवाड)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
मुंबई

Jjolapara
13/09/24
Jignesh. C Jolapara

**फिर्याद** दिनांक. १३/०९/२०२४

श्री. जिग्नेश छोटालाल जोलापरा, वय– ४४ वर्षे धंदा–नोकरी (खाजगी वाहन चालक), रा.ठी. बी/२, श्री जी नगर, ब्ल्यु आर्च बिल्डींग, समीर, न्यु लिंक रोड, महावीर नगर, कांदीवली, वेस्ट, मुंबई – ४०००६७. मोबाईल ९८१९२००८५२

०००००

मी वरील प्रमाणे असून, वर नमुद पत्यावर माझे कुटुंबासह राहतो. मी मुंबई मध्ये जन्मापासुन राहत असुन मला मराठी भाषा वाचता व लिहिता येते. मी माझे मालक श्री चेतन फरिया यांची हयुंडाई अ‍ॅक्टीव्ह आय २० ही गाडी क्र. एमएच ४७ के ३८२७ ही गाडी चालवितो. दिनांक ११/०९/२०२४ रोजी मी गाडी क्र. एमएच ४७ के ३८२७ ही घेवुन कल्याण येथे गेले होतो. परंतु तेथून परत घरी येताना, माझी गाडी घोडबंदर रोड येथे बंद पडली. नंतर पुन्हा ३० मिनिटानी परत चालु झाली. त्यानंतर मी घोडबंदर रोडने काशीमिरा येथे आलो असता रात्री २२: ४० वाचे सुमारास गाडी पुन्हा हॉटेल दिल्ली दरबार जवळ बंद पडली. सदरची गाडी मी रस्त्याच्या कडेला उभी करुन पार्किंग लाईट चालु ठेवली होती. त्यावेळी पाठीमागुन आलेली २ चाकी स्वाराने माझे गाडीस मागील उजवी साईटला धडक दिली, त्यावेळी मी माझ्या गाडीतुन खाली उतरुन पाहिले असता माझे गाडीचा टेल लाईट फुटला, व बंपरचे सुध्दा नुकसान झाले. तसेच गाडीच्या पाठीमागील उजव्या बाजुचा टायर फुटला होता. संदरची दुचाकी ही बुलेट होती तिचा क्रमांक एमएच ०३ ईएन ८४७६ असा होता. त्यावेळी मी खाली पडलेल्या बाईकस्वारास उठण्यास मदत केली. त्यावेळी पब्लीक सुध्दा जमा झाल्याने मी १०० नंबरला कॉल केला असता १० मिनिटांनी पोलीस आले. त्याचेसोबत मी काशीगांव पोलीस ठाणे येथे आलो. त्यावेळी तेथे बाईकस्वार हे मेडीकल करून आले होते. तेव्हा तेथील पोलीसांनी मंगेश म्हणुन बाईकस्वारास बोलविले त्यामुळे मला त्याचे नाव मंगेश असल्याचे समजले. मंगेश याने माझे लायसन्स काढुन घेतले व ड्राव्हर मध्ये ठेवले, आणि ते माझीच चुक असल्याचे सांगुन गाडी रोडला उभी का? अशी विचारणा माझ्याकडे केली असता त्यांना मी माझी गाडी बंद पडल्याने उभी केल्याचे सांगितले. मंगेश मला म्हणाले की, मी काशीगाव पोलीस ठाण्यात हवालदार आहे तु जास्त बोलु नकोस. माझी चुक आहे असे सांगुन रोड साईडला गाडी पार्कीग केलीस. त्यानंतर पोलीसांनी माझी कोणताही तक्रार घेतली नाही. व मंगेश याने मला धमकी दिली की तुझ्या मुळे मी पडलो त्यामुळे तु मला १० लाख दे, त्यावेळी मी त्याना सागितले की मी ड्रायव्हर आहे. यांनी माझी ऐवढी ऐपत नाही. त्यावेळी मंगेश म्हणाला की, तुझ्या मालकाला रू. २०,०००/– गुग्गल पे करायला सांग. त्यानंतर मला दमदाटी करून चौकी मध्ये मारणार अशी धमकी दिली. तसेच तुझ्या मित्राला कॉल कर आणि पैसे मागव, नाही दिले तर तुझे लायसन्स सुध्दा भेटणार नाही आणि तुझ्यावर अशी कारवाई करू की तुला आणखी त्रास होईल असे सांगुन बाईकस्वार मंगेश यांनी माझेकडे रू. १०,०००/– रूपयाची मागणी केली. आणि आताचे आता मला पैसे पाहिजे असे सांगितले तेव्हा पोलीस स्टेशन मध्ये मी घाबरून माझे बॅक खात्यात रू.३५००/– असल्याचे सांगितले असता मंगेश याने ३०००/– मला दे असे सांगितले. त्यानंतर बाईकस्वार मंगेश यांनी उरलेले रू. ७,००००/– रुपये मला उया दुपारी १ वाजता काशीगाव पोलीस ठाणेस आणुन दे. जर तु उदया दिनांक १२/९/२०२४ रोजी दुपारी १ वा. उरलेले रू.७०००/– घेवुन आला नाहीस तर तुला माहित पडणार नाही अशी तुझी हालत काय करीन ते बघ, तुझ्या बॅक खात्यामध्ये किती रुपये आहेत असे सांगितले. आणि मी घाबरून पैसे देण्याची हमी दिल्यानंतर मला पैश्यासाठी रात्री ०१:१० मिनिटानी त्याचे मला गाडीवर बसवुन हॉटेल दिल्ली दरबार येथील चाय टपरी वर घेवुन गेले. त्या चाय टपरीचा मालक श्री सरफराज खान यांचे जी पे वर स्कॅन करून मला रू. ३,०००/– गुगल पे करण्यास सांगितले. मी श्री सरफराज खान यांना रात्री ०१:१८ वाजता रू. ३०००/– गुगल पे केले त्यामध्ये मी मंगेश अन्ना हवालदार फॉर रिश्वत हराश्मेंट असे इंग्रजी लिपीमध्ये पैशे पाठवण्याचे कारण नमूद केले आहे. त्यानुसार बाईकस्वार मंगेश यांनी त्यांचेकडून रू. ३,०००/–( रू.५०० च्या ६ नोटा) अशी रक्कम घेतली. त्यांना पैसे मिळाल्यानंतर त्यांनी मला घरी जाण्यास

Jjolapara
13/09/24

सांगितले. व दिनांक १२/०९/२०२४ रोजी दुपारी १ वाजता रू. ७,०००/— घेवुन आल्यानंतर मी उदया तुला लाईसन्स देता असे सांगितले. मी घरी आल्यावर दिनांक १२/०९/२०२४ रोजी १२.३३ वाजता मंगेश यांनी मला त्यांचे मोबाईल क्र. ७७७७०२०३१५ मला पैश्यासाठी एकुण चार वेळा कॉल केले. आणि मला पैसे आणण्यासाठी सांगितले.

काशीगाव पोलीस ठाणेचे पोलीस मंगेश यांनी माझे गाडीचे झालेल्या अपघाताबाबत कोणतीही कारवाई न करता तसेच माझे लाईसन्स क्र एमएच ०२ २००९००५०८९० हे सोडविण्यासाठी माझेकडे रू. १०,०००/— ची मागणी करून त्यातील रू. ३,०००/— टपरी मालकाचे माध्यमाने घेवुन उर्वरीत ७,०००/—रू रक्कम घेण्यासाठी मला काशीगांव पोलीस ठाणेस बोलविले. परंतु बाईकस्वार मंगेश यांना मला लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने मी लाचलुचपत प्रतिबंधक वरळी, मुंबई येथील कार्यालयात जावुन काशीगांव पोलीस ठाणेचे बाईकस्वार मंगेश यांचे विरूध्द तक्रार दिली. त्यानंतर पो.नि गायकवाड यांनी माझी व सरकारी पंच याची ओळख करून दिली व गोपनिय कक्षामध्ये जावून वक्तव्य रेकॉर्ड करण्यात आले त्यांनतर पो.नि गायकवाड यांनी माझी पडताळणी पथकाशी ओळख करून दिली त्यानंतर आम्ही पडताळणी पथक सरकारी वाहनाने लाप्रवि कार्यालय येथून निघालो व त्यांनतर मी, पोलीस पथक व पंच असे शासकीय वाहनाने रंगशारदा बांद्रा या ठिकाणी गेल्यावर लोकसेवक यानां भेटण्याचे ठिकाणाबाबत विचारणा करण्या करीता फोन करणे आवश्यक असल्याने पो.नि गायकवाड यांनी डीव्हीआर चालू केला व त्यानंतर मी माझे मोबाईल क्र ९८१९२००८५२ यावरून आलोसे याचे मोक्र ७७७७०२०३१५ या वर संपर्क केला असता लोकसेवकाने दोन सरकारी पंचासमक्ष ७,०००/— रू लाचेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केले. त्यानंतर मोबाईल बंद केल्यानंतर डी व्हीआर बंद करण्यात आला. आलोसे यांनी लाचेची रक्कम स्विकारण्या करीता अंधेरी मेट्रो रेल्वे स्टेशन येथे बोलावले असल्याने आम्ही सर्व पथक अंधेरी पूर्व बस स्टॉप येथे आल्यानंतर सापळा कारवाई करीता पो.नि गायकवाड यांनी मला व सरकारी पंचाना सुचना दिल्या तसेच लाचेची ७,०००/— रू रक्कमेस चालकाने अँथ्रासिन पावडर लावून माझे शर्टचे वरील खिशात ठेवली व त्यांनतर पो.नि.गायकवाड यांनी डीव्हीआर चालू करून माझे बनियानला लावण्यात आले त्यांनतर मी माझे मोबाईल क्र ९८१९२००८५२ यावरून आलोसे याचे मोक्र ७७७७०२०३१५ या वर संपर्क केला आणि मी प्रसादम हॉटेलचे समोर आलो असल्याचे सांगितले. त्यांनंतर मी व सरकारी पंच क्र ०१ असे दोघे चालत प्रसादम हॉटेलचे दिशेने जात असताना लोकसेवक यांनी त्याचे वरील मो क्र यावरून माझे वरील मोबाईल क्रमांकावर फोन लावला व मला प्रसादम हॉटेलचे समोरील रस्त्याचे पलीकडे बोलावून घेतले.

त्यावेळी सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक मंगेश यांना मला तुझे बरोबर कोन आलय? तसेच माझे शर्ट ला हात लावून काय आहे ? असे विचारणा केली असता मी काय नाही असे सांगितले तेव्हा लोकसेवकास संशय आल्याने त्यांनी माझे शर्टला हात लावुन व माझे शर्टाचे खिश्यास चापसून झटापट केली त्यावेळी सापळा पथकातील अधिकारी यांनी लोकसेवक मंगेश यांस अंधेरी मेंटो ब्रिज खाली, प्रसादम हॉटेलचे समोर रस्त्याचे पलीकडे फुटपाथवर, अंधेरी पोलीस ठाणेस चे बाजुस ताब्यात घेतले. त्यांनतर मी पो.नि गायकवाड यांनी डिव्हीआर बंद केला आणि तो त्याचे ताब्यात घेतला .त्यांनतर माझे समक्ष पोलीसांनी लोकसेवकास नाव पत्ता विचारला असता त्यांनी त्याचे नाव मंगेश नामदेव रक्ष वय ४२ वर्षे, पोलीस शिपाई बंन ०६२९८ ने. काशिगाव पोलीस ठाणे , मीरा रोड पूर्व जि.ठाणे रा. ठि रूम नं. १८, बिल्डींग नं १०, बी/विंग, पंतनगर रेल्वे पोलीस लाईन, घाटकोपर पूर्व मुंबई असे सांगितले.

तरी लोकसेवक श्री. मंगेश नामदेव रक्षे, यांनी त्यांचे माझे गाडीला झालेल्या अपघाताबाबत कारवाई न करण्या करीता तसेच माझे लाईसन्स सोडविण्यासाठी माझ्याकडे रु. १०,०००/— लाचेची मागणी करुन, आपले कर्तव्य बजावण्या पासून परावृत राहून, अनधिकृत व बेकायेशीर रित्या गैरफायदा घेण्याकरीता दिनांक १२/०९/२०२४ रोजी चाय टपरीचा मालक श्री सरफराज खान यांचे जी पे वर स्कॅन करून माझ्या कडुन रू. ३,०००/— गुगल पे मार्फत रु.३०००/— लाचेची रक्कम स्विकारुन त्यानंतर माझेकडे रू. ७,०००/— रूपयाची मागणी करून स्वीकारण्याचे मान्य केले तसेच सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक श्री मंगेश याने रू ७,०००/— लाचेची रक्कम स्विकारण्याचा प्रयत्न केला म्हणून माझी लोकसेवकाविरूध्द कायदेशीर तक्रार आहे.

माझी वरील फिर्याद मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केली असून, ती मी वाचून पाहिली असता, ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

( अविनाश गायकवाड ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग,
बृहन्मुंबई विभाग, मुंबई

13/09/24

INSPECTOR OF POLICE
सत्यमेव जयते
MUMBAI
ANTI-CORRUPTION BUREAU

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे ...... तात्काळ
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकूण मुल्य ......
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक : ......
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची धोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फि' यांच्या गाडीला झालेल्या अपघाताबाबत कारवाई न करण्याकरिता तसेच त्यांचे लायसन्स सोडविण्याकरिता फि' कडे रु. ५०००/- लाचेची मागणी करुन स्विकारण्याचे मान्य केले. तसेच सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक यांनी त्यांचे कर्तव्य बजावण्यापासून परावृत्त राहून गैरफायदा घेणे-करिता रु. ५०००/- लाचेची रक्कम स्विकारण्याचा प्रयत्न केला. म्हणून गुन्हा नोंद

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावरं घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

अविनाश नानासाहेब गायकवाड, पोलीस निरीक्षक

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ......

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ......, जिल्हा ......, राज्य ......,

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ...... Rank...... No. ...... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ...... (3) Transferred to P.S ......, District ...... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.) 13/09/24

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name अविनाश नानासाहेब गायकवाड
पदनाम Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड. क्र. ......
Posting
Code No. of I. O. ......

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ......
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4.तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**